Sakal

# डी. पी. भोसले महाविद्यालयाची 'नॅक'कडून पाहणी

**कोरेगाव, ता. २६ :** रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले महाविद्यालयास आज 'नॅक' अर्थात नॅक ॲक्रिडेशन कौन्सिलने भेट देऊन दिवसभर महाविद्यालयाची विविध अंगाने पाहणी करून माहिती घेतली.

नॅक समितीत आंध्र प्रदेशातील श्री पद्मावती महिला विश्वविद्यालयाच्या माजी कुलगुरू डॉ. जमुना दुवरू यांच्या नेतृत्वाखाली बिहारमधील भागलपूर विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. उदयप्रकाश सिन्हा व उत्तराखंडमधील अगस्थीमुनी येथील शासकीय महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. गोविंदसिंग राजवर या दोघांचा समावेश आहे. या समितीचे आज सकाळी येथील जुना मोटर स्टँडवर एक्स डिपियन्सच्या वतीने सी. आर. बर्गे, दीपक देवरे, रामभाऊ घार्गे, मुकुंद बर्गे आदींनी, तर महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, एस. एन. कोळेकर आदींसह राष्ट्रीय छात्र सेनेच्या पथकाने स्वागत केले. त्यानंतर दिवसभर समितीने महाविद्यालयाची पाहणी केली, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, प्लेसमेंट सेलला भेट दिली. माजी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. शैक्षणिक, सांस्कृतिक विभागांची तपासणी केली. दरम्यान, ही समिती उद्या (मंगळवारी) महाविद्यालयातील क्रीडा आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेणार आहे.



**कोरेगाव : डॉ. जमुना दुवरू, सदस्य डॉ. उदयप्रकाश सिन्हा, डॉ. गोविंदसिंग राजवर यांचे भव्य स्वागत करण्यात आले. त्या वेळी प्राचार्य विजयसिंह सावंत आदी.**

# हवाई बीजगोळे पेरणीतून ३५ टक्के रोपनिर्मिती

## सामाजिक वनीकरण व डी. पी. भोसले कॉलेजचे यश; नॅक समितीकडून पाहणी

**कोरेगाव, ता. २७ :** सामाजिक वनीकरण विभागाने येथील डी. पी. भोसले कॉलेजच्या सहयोगातून श्री जरंडेश्वर डोंगर परिसरामध्ये गेल्यावर्षी केलेले रोप रोपण आणि हवाई बीजगोळे पेरणीतून ३५ टक्के रोपनिर्मिती झालेली आहे. या रोपनिर्मितीची पाहणी भोसले कॉलेजमध्ये आलेल्या नॅक समितीने प्रत्यक्ष डोंगरात भेट देऊन करून कॉलेजचे कौतुक केले.

नॅक समितीच्या प्रमुख आंध्र प्रदेशातील श्री पद्मावती महिला विश्वविद्यालयाच्या माजी कुलगुरू डॉ. जमुना दुवरू यांच्या नेतृत्वाखालील बिहारमधील भागलपूर विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. उदयप्रकाश सिन्हा आणि उत्तराखंडमधील अगस्थीमुनी येथील शासकीय महाविद्यालयाचे माजी



**जरंडेश्वर डोंगर : बीजरोपणाची पाहणी करताना डॉ. जमुना दुवरू, डॉ. उदयप्रकाश सिन्हा. त्यावेळी प्राचार्य विजयसिंह सावंत, डॉ. बी. एस. चव्हाण, राहुल काळे, डॉ. एस. डी. जाधव आदी.**

प्राचार्य डॉ. गोविंदसिंग राजवर या दोघा सदस्यांच्या समितीने जरंडेश्वर डोंगर परिसरास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, नॅक समिती समन्वयक डॉ. बी. एस. लकडे, सहसमन्वयक डॉ. व्ही. एस. कोष्टी, डॉ. एस. डी. जाधव, प्रा. डॉ. बी. एस. चव्हाण, डॉ. एस. पी. नलवडे, डॉ. एस. एम. देशपांडे, एस. यू. कणसे आदींसह सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कोरेगावचे वनक्षेत्रपाल राहुल काळे, त्यांचे सहकारी उपस्थित होते. बीजरोपण करण्यात आलेल्या परिसराची पाहणी करताना नॅक समिती प्रमुख डॉ. जमुना दुवरू यांनी तिरूमला येथे रक्तचंदनाची हवाई पेरणी करून एक उत्तम जंगल तयार केल्याची आठवण करून दिली. जरंडेश्वर डोंगरातील जैवविविधता व डोंगराचे पुरातन महत्त्व जाणून घेतले. सामाजिक वनीकरण विभाग आणि डी. पी. भोसले कॉलेजने डोंगर परिसरात केलेले बीजरोपण आणि हवाई बीजगोळे पेरणी उपक्रम, त्यात मिळालेल्या यशाचे कौतुकही केले.

डोंगराळ भागात जिथे मनुष्यास जाणे कठीण होते, अशा ठिकाणी सामाजिक वनीकरण विभाग व भोसले कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केलेली हवाई बीजगोळे पेरणी आणि त्यातून मिळालेल्या यशाची माहिती वनक्षेत्रपाल काळे यांनी नॅक समितीला दिली.

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# डी. पी. भोसले कॉलेजला नॅकचे मानांकन

**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**दहिवडी , दि. ६ ऑगस्ट:** कोरेगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजला नॅकचा अ ++ दर्जा (सी.जी.पी.ए.- ३.७७) प्राप्त झाला आहे. नुकत्याच २६ व २७ जून रोजी महाविद्यालयाला नॅकच्या चौथ्या फेरीच्या मूल्यांकनासाठी नॅक पिअर टीमने भेट देऊन महाविद्यालयाचे मूल्यांकन केले आणि महाविद्यालयाला हा दर्जा दिला.

समितीमध्ये चेअरमन श्री पद्मावती महिला महाविद्यालय आंध्रप्रदेशच्या माजी कुलगुरू डॉ. जमुना दुव्वरू , प्रमुख समन्वयक टी. एम. भागलपूर विद्यापीठ बिहारचे माजी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. उदय प्रकाश सिन्हा, तर सदस्य समन्वयक म्हणून गव्हर्मेंट पी. जी. कॉलेज अगस्त्यमुनी, उत्तराखंडचे माजी प्राचार्य डॉ. गोविंद सिंग राजवर हे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक, प्रा. डॉ. भगवान लोकडे, सहसमन्वयक डॉ. विजयकुमार कोष्टी, क्रायटेरिया प्रमुख, डॉ. विजयकुमार कोष्टी, डॉ. नितीन निकम, डॉ. विनायक जमदाडे, डॉ. महादेव हांडे, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. शैलेजा देशपांडे, डॉ. सविता नलवडे, प्रभारी, प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण, उपप्राचार्य डॉ. सुनील जाधव, साधू कोळेकर. चंद्रकांत जावळे, तंत्रज्ञ म्हणून केतन जाधव, जफर मणेर, केतकी माने, कार्यालय प्रमुख सचिन अलकुंटे ,राष्ट्रीय सेवा योजनाप्रमुख दौलत पाटील, राष्ट्रीय छात्र सेनाप्रमुख बाळासाहेब भोसले तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी या कामी परिश्रम घेतले.



सध्या नॅकच्या चौथ्या फेरीतील मूल्यांकनात ग्रामीण भागातील सर्वाधिक गुण मिळविलेले हे एकमेव महाविद्यालय आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सहसचिव डॉ. ज्ञानदेव मस्के, ऑडीटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आमदार विश्वजित कदम, एक्सडीपीएन्सचे असोसिएशनचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ व पालक यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी

# डी.पी. भोसले कॉलेजला नॅकचा 'अ ++' दर्जा

**कोरेगाव / प्रतिनिधी**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजला नॅकचा 'अ ++' दर्जा (सी. जी.पी.ए.- ३.७७) प्राप्त झाला आहे. नुकत्याच २६, २७ जून रोजी महाविद्यालयाला नॅकच्या चौथ्या फेरीच्या मूल्यांकनासाठी नॅक पिअर टीमने भेट देऊन महाविद्यालयाचे मूल्यांकन केले आणि महाविद्यालयाला हा दर्जा दिला. समितीमध्ये चेअरमन श्री पद्मावती महिला महाविद्यालय आंध्रप्रदेशच्या माजी कुलगुरू डॉ. जमुना दुव्वरू , प्रमुख समन्वयक टी. एम. भागलपूर विद्यापीठ बिहारचे माजी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. उदय प्रकाश सिन्हा, तर सदस्य समन्वयक म्हणून गव्हर्मेंट पी. जी. कॉलेज अगस्त्यमुनी, उत्तराखंडचे माजी प्राचार्य डॉ. गोविंद सिंग राजवर हे होते.



डी. पी. भोसले कॉलेजचा परिसर.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक, प्रा. डॉ. भगवान लोकडे, सह समन्वयक डॉ. विजयकुमार कोष्टी, क्रायटेरिया प्रमुख, डॉ. विजयकुमार कोष्टी, डॉ. नितीन निकम, डॉ. विनायक जमदाडे, डॉ. महादेव हांडे, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. शैलेजा देशपांडे, डॉ. सविता नलवडे, प्रभारी, प्राचार्य डॉ. बाळसाहेब चव्हाण, उप. प्राचार्य डॉ. सुनील जाधव, साधू कोळेकर. चंद्रकांत जावळे, तंत्रज्ञ म्हणून केतन जाधव, जफर मणेर, केतकी माने, कार्यालयप्रमुख सचिन अलकुंटे, राष्ट्रीय सेवा योजनाप्रमुख दौलत पाटील, राष्ट्रीय छात्र सेनाप्रमुख बाळासाहेब भोसले तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी या कामी परिश्रम घेतले.

सध्या नॅकच्या चौथ्या फेरीतील मूल्यांकनात ग्रामीण भागातील सर्वाधिक गुण मिळविलेले हे एकमेव महाविद्यालय आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, सह सचिव डॉ. ज्ञानदेव मस्के, ऑडीटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन आ. विश्वजित कदम, एक्सडीपीएन्सचे असोसिएशनचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे आजी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, पालकांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज
https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# डी.पी.च्या यशाने रयतच्या गौरवात भर : डॉ.विश्वजीत कदम

## नॅकच्या यशाबद्दल अभिनंदन ; दहा लाखांची देणगीही



**महाराष्ट्र न्यूज नेटवर्क**

**दहिवडी , दि. २८ ऑगस्ट :** डी.पी. भोसले कॉलेजने नॅकचे अ++ हे मानांकन मिळवल्याने आमदार डॉ.विश्वजीत कदम यांनी कॉलेजचे अभिनंदन केले आहे. डी.पी. भोसले कॉलेजने रयत शिक्षण संस्थेच्या गौरवात भर घातल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी कॉलेजला त्यांनी भारती विद्यापीठातर्फे दहा लाख रुपयांची देणगीही जाहीर केली.कॉलेजच्यावतीने आयोजित अभिनंदन सोहळ्यात महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष असलेले आमदार डॉ. कदम बोलत होते. यावेळी समिती सदस्य डॉ.विजयसिंह सावंत, रयतफ्ने कार्यकारणी सदस्य सुनील खत्री, सौ. आर. बर्गे, विजय घार्गे, पोपटराव कर्पे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब चव्हाण उपप्राचार्य प्रा.साधू कोळेकर,डॉ.भगवान लोकडे, प्रा.बाळासाहेब भोसले उपस्थित होते. आ.डॉ.कदम यांनी नॅकचा दर्जा मिळाल्याबद्दल माजी प्राचार्य डॉ.सावंत, समन्वयक प्रा. डॉ.लोकडे, सहसमन्वयक डॉ. विजयकुमार कोष्टी, डॉ. नितीन निकम, डॉ. विनायक जमदाडे, डॉ.महादेव हांडे डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. शैलेशा देशपांडे, डॉ. सविता नलावडे यांचा सत्कार केला.डॉ.सावंत यांनी पतंगराव कदम व विश्वजीत कदम यांचे मार्गदर्शन ,अंतर्गत गुणवत्ता कक्ष, सेवकांच्या सहकार्यामुळे हे उत्तुंग यश मिळवू शकलो, असे सांगितले. प्रभारी प्राचार्य डॉ. चव्हाण यांनी प्रस्ताव केले. प्रा.साधना पाटील, डॉ.कुशल राऊत यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य साधू कोळेकर यांनी आभार मानले.

सकाळ

# 'डीपी'च्या पाच मुली मुंबई पोलिसात दाखल

## कोरेगावात एकाच वेळी यश; भोसले महाविद्यालयातर्फे केला गौरव

**कोरेगाव, ता. २४ :** रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात विविध शाखांत शिक्षण घेत असलेल्या पाच मुली एकाच वेळी मुंबई पोलिस दलात भरती झाल्या आहेत. आपले हे यश महाविद्यालयात मिळालेले क्रमिक, क्रीडाविषयक शिक्षण, सराव आणि राष्ट्रीय छात्र सेनेतून मिळालेल्या शिस्तीचे असल्याचे सर्व मुलींनी नमूद केले.

प्रा. बाळकृष्ण भोसले यांच्या नेतृत्वाखालील महाविद्यालयाचा क्रीडा आणि राष्ट्रीय छात्र सेना विभागही देदीप्यमान कामगिरी करत आहेत. आजवर अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी जिल्हा ते राष्ट्रीयस्तरापर्यंत उशाची मजल मारत कॉलेजचे नाव उज्ज्वल केले आहे. या दोन्ही विभागांमधील अनेक मुले-मुली भारतीय सैन्य दलाच्या हवाई, नाविक आणि भूदलात भरती होऊन देशसेवा करत आहेत. अनेकजण महाराष्ट्र पोलिसासह अनेक दलांत भरती झाले आहेत.

अशा पार्श्वभूमीवर नुकत्याच महाविद्यालयातील आरती बर्गे (सुलतानवाडी), दीप्ती जगदाळे (चंचळी), स्वाती कोडूलकर (बोधेवाडी), दीप्ती ढोले (चिलेवाडी) आणि भाग्यश्री पवार (आझादपूर) या मुंबई पोलिस दलात भरती झाल्या आहेत. त्यांनी आज एकत्रित येऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. बाळकृष्ण भोसले यांची भेट घेऊन आपल्या पोलिस भरतीत महाविद्यालयात मिळालेले क्रमिक शिक्षण, क्रीडा आणि राष्ट्रीय छात्र सेनेमधून मिळालेले क्रीडाविषयक मार्गदर्शन, सराव आणि शिस्तीचे मोठे योगदान असल्याचे सांगत महाविद्यालयाबाबत ऋण व्यक्त केले. प्राचार्य डॉ. सावंत, प्रा. भोसले यांनी त्यांचा गौरवही केला.



**कोरेगाव : पोलिस दलात भरती झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत. त्या वेळी प्रा. बाळकृष्ण भोसले, डॉ. प्रतिभा पाटील, डॉ. बी. एस. लोकडे, डॉ. व्ही. एस. जमदाडे.**

सकाळ

# शिक्षकांनी बापाचा धाक अन् आईची हाक जपावी

## इंद्रजित देशमुख; डी. पी. भोसले कॉलेजमध्ये विद्यार्थी अध्यापनाने शिक्षक दिन

**कोरेगाव, ता. ८ :** शिक्षकांनी हसऱ्या चेहऱ्याने वर्गात जाऊन अगदी शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञान पोचवावे आणि बापाचा धाक अन् आईची हाक काळजात जपावी, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी केले.



**कोरेगाव : डॉ. कीर्ती कुडाव यांचा सत्कार करताना इंद्रजित देशमुख. त्या वेळी प्रभारी प्राचार्य बाळासाहेब चव्हाण, सखाराम बिराजदार.**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये शिक्षक दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात श्री. देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण होते. या वेळी सहायक पोलिस निरीक्षक सखाराम बिराजदार, प्रशासकीय उपप्राचार्य आणि इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. भगवान लोकडे, उपप्राचार्य एस. एस. साळुंखे, कनिष्ठ विभाग उपप्राचार्य आर. टी. ढोपे, वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागाचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. एकाग्रता ही माणसाच्या विकासाचा आधार असते. तारुण्यात पराक्रम केला नाही, तर भविष्यात जीवनात अंध:कार येऊ शकतो. आज माहितीचा भडीमार आहे, त्याची सत्यता तपासण्यासाठी व शाश्वत ज्ञानासाठी शिक्षकांचीच गरज आहे, असे मतही श्री. देशमुख यांनी व्यक्त केले.

प्रभारी प्राचार्य बाळासाहेब चव्हाण यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. स्टाफ वेल्फेअर समितीचे अध्यक्ष प्रा. डी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. देवानंद सोनटक्के यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. साधना पाटील आणि प्रा. कुशल राऊत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. लोकडे यांनी आभार मानले. प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी वाणिज्य विषयात पीएचडी पदवी मिळवल्याबद्दल डॉ. कीर्ती कुडाव यांचा व कोरेगावचे सहायक पोलिस निरीक्षक सखाराम बिराजदार यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक दिनाच्या दिवशी विद्यार्थी शिक्षक झालेल्या एकदिवसीय विद्यार्थी प्राचार्या विजया वाडेकर व विद्यार्थी अतुल शिंदे व सर्व विद्यार्थी शिक्षक, सर्व शिक्षक व कार्यालयीन सेवकांचा सत्कार झाला.

Satara, Satara-Today
09/09/2023 Page No. 3

सकाळ

# कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेची कोरेगावात मिरवणूक

## डी. पी. भोसले कॉलेजतर्फे कार्यक्रम; नागरिकांतर्फे प्रतिमेचे पूजन

**कोरेगाव, ता. २२ :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्ताने येथील डी. पी. भोसले महाविद्यालयाने कोरेगाव शहरातून कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढली.

सकाळी महाविद्यालयामध्ये अण्णांच्या प्रतिमेचे पूजन प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या हस्ते झाले. कर्मवीर अण्णांची प्रतिमा असलेला रथ सजवून घोषणांच्या निनादात महाविद्यालय ते तहसीलदार चौक, जुने स्टँड, आझाद चौक, मुख्य बाजार पटांगण, भैरवनाथ मंदिर, ग्रामीण रुग्णालय अशी मिरवणूक काढण्यात आली. त्यात कनिष्ठ आणि वरिष्ठ वर्गांचे हजारो विद्यार्थी- विद्यार्थिनी, माजी विद्यार्थी, सेवक सहभागी झाले होते. गावामध्ये ठिकठिकाणी नागरिकांतर्फे अण्णांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.




**कोरेगाव : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी काढलेल्या कर्मवीर प्रतिमेच्या मिरवणुकीत हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते.** (छायाचित्र : **जफर मणेर, कोरेगाव**)

कर्मवीर जयंतीनिमित्त महाविद्यालयात १४ सप्टेंबरपासून आजअखेर निबंध, वक्तृत्व, छायाचित्र, मातीकाम, पोस्टर, भित्तिचित्र, पुष्पसजावट, मेंदी, रांगोळी, प्रश्नमंजूषा, वादविवाद, कातरकाम अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक, आजी- माजी विद्यार्थ्यांनी मिरवणुकीचे यशस्वी आयोजन केले.